**बृहन्मुंबई महानगरपालिका आर्थिक सहाय्य रूपाने**

**पुरवित असलेल्या सेवासुविधांबाबतचा मुंबई महानगरपालिका**

**अधिनियम १८८८ च्या कलम १२६ ग अनुसार**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांसमवेत**

**सादर करावयाचा अहवाल**

# REPORT BY B. M. C. UNDER SECTION 126G OF THE M.M.C. ACT 1888 ON THE SERVICES PROVIDED IN SUBSIDISED MANNER TO BE SUBMITTED ALONG WITH BUDGET ESTIMATES 2025-26

**मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८च्या कलम १२६ ग अनुसार महानगरपालिका**

**आर्थिक सहाय्य रुपाने पुरवित असलेल्या सेवासुविधांचा**

**सन २०२५ -२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांसमवेत सादर करावयाचा अहवाल**

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १२६'ग' अन्वये सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजासमवेत मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईतील नागरीकांना पुरविल्या जात असलेल्या सेवांपैकी खालील ज्या काही सेवा अर्थसहाय्य देऊन पुरविल्या जात आहेत, त्यांच्या अर्थसहाय्याची मर्यादा, ज्या साधनातून त्या सेवांसाठी अर्थसहाय्य देण्यात आले ते साधन आणि स्थानिक लोकसमुदायाचे जे भाग किंवा वर्ग अशा अर्थसहाय्याचे लाभधारक आहेत, त्याबाबतचा अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तथापि ,सदर अधिनियमाच्या कलम ६क(१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित असल्यामुळे सदर अहवाल मी अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियमच्या कलम ६क(१) सह वाचावयाच्या कलम १२६ ग अन्वये प्रशासक (स्थायी समिती) ह्यांस सादर करीत आहे.

(अ) पाणी पुरवठा व मलनि:सारण,

(ब) कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे,

(क) महानगरपालिका परिवहन आणि

(ड) रस्त्यांवरील दिवाबत्तीची व्यवस्था

२. मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प 'ग' (फंड कोड ४०) अंतर्गत महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा व मलनि:सारण ही सेवा देण्यात येते व अर्थसंकल्प 'अ' (फंड कोड ११) अंतर्गत कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे आणि रस्त्यांवरील दिवाबत्तीची व्यवस्था करणे या सेवा पुरविण्यात येतात. याबाबतचा कलम १२६ ग अन्वये आवश्यक असलेला अहवाल एकत्रितरित्या सादर करण्यात येतो. मुंबईतील महानगरपालिका परिवहन सेवा या अर्थसंकल्प 'क' अंतर्गत येतात आणि त्यांचे व्यवस्थापन मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन या स्वतंत्र उपक्रमाद्वारे केले जाते. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम १२६ ग अन्वये अर्थसंकल्प 'क' बाबत आवश्यक असलेला अहवाल, महाव्यवस्थापक, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम यांनी मुंबई विद्युत पुरवठा परिवहन समिती आणि महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे सादर करावयाचा आहे.

३. पाणी पुरवठा व मलनि:सारण, कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे आणि रस्त्यांवरील दिवाबत्तीची व्यवस्था या बाबतचा अहवाल खालीलप्रमाणे आहे :-

**३.१ पाणी पुरवठा व मलनि:सारण :**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम, ६१(ब) अंतर्गत बृहन्मुंबई हद्दीतील नागरिकांना तसेच उद्योगधंदे, व्यवसाय आदींना पाणी पुरवठा करणे तसेच कलम ६१(अ) अंतर्गत मलनि:सारणाची व्यवस्था करणे ही महानगरपालिकेची बंधनकारक कर्तव्ये असून ती अर्थसंकल्प 'ग' (फंड कोड-४०) अंतर्गत येतात. त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई हद्दीतील नागरिकांना पाणी पुरवठा व मलनि:सारण व्यवस्था या सेवा पुरविते. गलिच्छ वसाहती, चाळी, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती या मधील घरगुती वापरासाठी तसेच शैक्षणिक, धर्मदाय संस्था, धर्मशाळा व शासकीय कारागृहे या ग्राहक प्रवर्गांना पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवेसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाहून कमी दराने आकारणी करुन आर्थिक सवलतीचा लाभ देते. बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाणी पुरवठा करण्यासाठी मागील वर्षामध्ये (२०२३-२४) महसूली खर्चावर आधारित रु.२४.९२ इतका खर्च प्रति हजार लिटर्ससाठी आणि मलनि:सारणाकरिता रु.३०.९२ इतका खर्च प्रति हजार लिटर्सला येत आहे. तथापि, घरगुती वापरासाठी तसेच इतर बिगर घरगुती (व्यावसायिक) उपयोगासाठी जलमापकाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर हे ग्राहकांची जलआकार भरण्याची क्षमता वा व्यवसायाचे स्वरुप यांचा विचार करुन स्थायी समितीने वेळोवेळी संमत / सुधारणा केलेल्या जलआकार सूचीनुसार आकारण्यात येतात.

अ) घरगुती वापरासाठी करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये गलिच्छ वस्त्यांमध्ये देण्यात येणाऱ्या सामाईक वा वैयक्तिक जलजोडण्या चाळीमध्ये तसेच उंचावरील झोपडपट्टयांमध्ये राहणा-या नागरिकांना देण्यात येणाऱ्या जलजोडण्या या प्रवर्गास, महानगरपालिका पुरवित असलेल्या एकूण पाणी पुरवठयापैकी मागील वर्षामध्ये (२०२३-२४) सुमारे २०६२६६ दशलक्ष लिटर्स इतका पाणी पुरवठा केला आहे. त्यासाठी रु.४.७६ ते रु.९.५४ इतका जलआकार अधिक त्यावर ७०टक्के मलनि:सारण आकार प्रति हजार लिटर्ससाठी आकारण्यात येतो. या प्रवर्गाला करण्यात येणाऱ्या सदर पाणी पुरवठयापोटी महानगरपालिकेला एकूण रु.२००.२७ कोटी इतका महसूल मागील वर्षामध्ये (२०२३-२४) प्राप्त झाला. परंतु सदर पाणी पुरवठा व मलनि:सारणाकरिता महानगरपालिकेला एकूण रु.९०४.०१ कोटी इतका खर्च

मागील वर्षामध्ये (२०२३-२४) आला असल्याने सदर सेवांकरिता या प्रवर्गाला वर्षभरात एकूण रु.७०३.७४ कोटी इतकी आर्थिक सवलत दिली आहे.

ब) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमधील रहिवाशी, धर्मदाय संस्था तथा शिक्षण संस्था, कारागृहे, सार्वजनिक उद्याने इत्यादी प्रकारच्या प्रवर्गास मागील वर्षामध्ये (२०२३-२४) सुमारे ५००४८२ दशलक्ष लिटर्स इतका पाणी पुरवठा करण्यात आला आहे. त्यासाठी या प्रवर्गास प्रति एक हजार लिटर्ससाठी रु.६.३६ आणि रु.१२.७४ इतका जल आकार अधिक त्यावर ७० टक्के मलनि:सारण आकार आकारण्यात येतो. या प्रवर्गाकडून सदर पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवेपोटी महानगरपालिकेला मागील वर्षामध्ये (२०२३-२४) रु.७८८.७२ कोटी इतका महसूल प्राप्त झाला. परंतु त्यासाठी महानगरपालिकेला वर दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.२१९३.४९ कोटी इतका खर्च मागील वर्षामध्ये (२०२३-२४) करावा लागला असल्याने, या प्रवर्गाला या सेवेपोटी वर्षभरात एकूण रु.१४०४.७७ कोटी इतका आर्थिक सवलतीचा फायदा दिला आहे. अशाप्रकारे घरगुती ग्राहकांच्या वरील दोन्ही प्रवर्गांना मागील वर्षामध्ये (२०२३-२४) एकूण रु.२१०८.५१ कोटी इतका आर्थिक सवलतीचा लाभ मिळाला आहे.

क) वरील प्रवर्गाव्यतिरिक्त व्यापार, उद्योग व इतर विविध व्यावसायिक उपयोगासाठीच्या ग्राहक प्रवर्गालाही महानगरपालिका पाणीपुरवठा करीत असते. त्यासाठी त्यांच्या व्यवसायाचे स्वरुप विचारात घेऊन त्यांना प्रति एक हजार लिटर्ससाठी रु.२५.४६ पासून रु.१९०.९७ पर्यंत असा जल आकार व त्यावर ७० टक्के मलनि:सारण आकार आकारण्यात येतो. त्यामुळे जरी पाण्याच्या घरगुती वापरासाठी वर नमूद केलेल्या दोन्ही प्रवर्गातील ग्राहकांना आकारल्या जाणाऱ्या दरात महानगरपालिका आर्थिक सवलत देत असली तरी या सवलतीची काही प्रमाणात भरपाई व्यापार, उद्योग व इतर विविध व्यावसायिक उपयोगासाठीच्या ग्राहक प्रवर्गाकडून मिळणाऱ्या महसूलातून होते .

**३.२ कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे :**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१(क) अन्वये कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे ही महानगरपालिकेची बंधनकारक कर्तव्ये असून ती अर्थसंकल्प 'अ' (फंड कोड ११) खाली मोडतात. सदर कर्तव्ये पार पाडीत असताना जरी या सेवांपासून मिळणारा महसूल अशा सेवांच्या खर्चाच्या तुलनेत नाममात्र असला तरी महानगरपालिकेला या सेवा, मुंबईतील सर्व थरातील लोकांना पुरवाव्या लागतात. मात्र, मुंबईतील नागरिकांकडून सर्वसाधारण कराव्यतिरिक्त महानगरपालिका स्वच्छता/सेवा यापोटी अन्य कुठलाही विशिष्ट आकार वसूल करीत नाही. तथापि, सदर सेवांवर होणारा बहुतांशी खर्च हा मालमत्ता करापासून, विशेषत: सर्वसाधारण करापासून व राज्यशासनाकडून जकात भरपाईपोटी मिळणा-या अनुदान सहाय्यापासून जमा होणाऱ्या महसुलातून भागविला जातो.

मुंबईतील बहुतांशी म्हणजे सुमारे ५० टक्के लोक हे झोपडपट्टयांमध्ये राहात असले तरीदेखील मुंबईतील इमारतींपासून मिळणाऱ्या मालमत्ता कराच्या तुलनेत, झोपडपट्टी वसाहतींकडून मिळणारा मालमत्ता कर हा नगण्य आहे. झोपडपट्टी वसाहतींकडून सर्वसाधारण करापासून मिळणारे उत्पन्न, अशाप्रकारची सेवा तेथे देण्यासाठी येणाऱ्या खर्चापेक्षा फारच कमी असून अन्य उत्पन्नामधून हा खर्च समायोजित करावा लागतो. मुंबईतील १ कोटी २४ लाख ३२ हजार (सन २०११ च्या जनगणनेनुसार) एवढया लोकसंख्येला साफसफाई सेवा देत असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने मागील वर्षी (२०२३-२४) साधारणत: रु.२७८१.१०१४ कोटी खर्च केला आहे तर व्यवसाय कचरा निर्मूलन इ. आकारापासून केवळ रु.४.८१ लाख उत्पन्न मिळाले आहे. याचाच अर्थ खर्च आणि उत्पन्नामधील साधारणत: १००% तफावत म्हणजेच रु.२७८१.०५३३ कोटी ही मुख्यत: महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व राज्यशासनाकडून जकात भरपाईपोटी मिळणाऱ्या अनुदान सहाय्य यासारख्या अन्य स्त्रोतांमधून मिळणाऱ्या उत्पन्नामधून भरुन काढली आहे.

**३.३ रस्त्यांवरील दिवाबत्तीची व्यवस्था :**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१(न) नुसार रस्त्यांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे हे सुध्दा महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे. त्यामुळे सदर सेवा पुरवित असताना ती कोणत्याही एका विभागाला, लोकवस्तीला, अशी न पुरविता ती सर्वांना आवश्यकतेनुसार पुरविली जाते. मुंबईमधील प्रमुख रस्ते, पदपथ, छोटे आणि अंतर्गत रस्ते, झोपडपट्टी वसाहतींमधील मार्गिका आणि पायवाटा, तसेच पूल व भुयारी मार्ग या ठिकाणी दिवाबत्तीची सोय करण्यासाठी मागील वर्षी (२०२३-२४) मध्ये अंदाजे रु.२६२.३२ कोटीच्या वर खर्च केला आहे. रस्त्यांवरील दिवाबत्तीपोटी होणारा खर्च भागविण्यासाठी कुठल्याही प्रकारचे उत्पन्नाचे स्वतंत्र स्त्रोत नसल्यामुळे सदरचा खर्च मालमत्ता कर व राज्यशासनाकडून जकात भरपाईपोटी मिळणा-या अनुदान सहाय्य सारख्या अन्य उत्पन्नामधून भागविण्यात आला आहे.

४. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) सह वाचावयाच्या कलम १२६ग (२) अन्वये या अहवालाची तपासणी करण्यासाठी व तिच्या कोणत्याही शिफारशी असल्यास त्यांच्यासह तो अहवाल प्रशासक (महानगरपालिका) ह्यांच्या पुढे ठेवण्यासाठी प्रशासक (स्थायी समिती) ह्यांस सादर.

(भूषण गगराणी)
**महानगरपालिका आयुक्त,**

**महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,**
**मुंबई.**
**दिनांक:२९.०१.२०२५**

## Report on the Services provided in subsidised manner

## under Section 126G of the M.M.C. Act,1888 to be submitted along with Budget Estimates 2025-26

In accordance with the provision of Section 126G of the Amended Mumbai Municipal Corporation Act 1888, along with Budget Estimates 2025-26, a report indicating that the following services provided by the corporation to the citizens of Mumbai in a subsidised manner to the extent of subsidy, the source from which the subsidy is met and the section or categories of the local population who are the beneficiaries of such subsidy is required to be submitted to the Standing Committee. As all the powers of Municipal corporation and it's other Authorities are now vested with Administrator under section 6C(1) of the said Act, I am submitting this Report to the Administrator (Standing Committee) under section 126G, read with section 6C(1) of the Amended Mumbai Municipal Corporation Act 1888.

a) Water Supply and Disposal of Sewage,

b) Scavenging, Transporting & Disposal of Waste,

c) Municipal Transport and

d) Street lighting

2. The services regarding Water Supply & Sewage Disposals are covered under Budget 'G' (Fund Code 40) and the services of Scavenging; Transporting & Disposal of Waste and Street lighting are covered under Budget 'A' (Fund Code 11). The report thereof, required under section 126G is submitted jointly. The services of Municipal Transport in Mumbai are covered under Budget 'C' and are handled by the B.E.S.T. undertaking which is an independent undertaking. The report under Section 126G for the Budget 'C' is required to be submitted by the General Manager, B.E.S.T. undertaking, separately to the B.E.S.T. Committee and the Corporation.

3. The report on Water Supply and Sewage Disposal, Scavenging, Transporting and Disposal of Waste and that on Street lighting is as under:

**3.1 Water Supply & Disposal of Sewage:**

Under Section 61(b) of Mumbai Municipal Corporation Act 1888, it is an obligatory duty of the Corporation to provide water supply to the citizens of Greater Mumbai for domestic, Commercial, Industrial and other purposes and under Section 61(a), to provide sewage disposal services. Accordingly the Brihanmumbai Municipal Corporation provides water supply and sewage disposal services in Mumbai and provides subsidised services to certain categories of consumers viz. residents in slums, chawls, premises of Co-Op. Housing Societies as well as educational, charitable institutions, dormitories and prisons/Jails etc.,

by charging them at lesser rates than the cost incurred thereon. At present, the corporation incurs an expenditure of Rs.24.92 per 1000 ltrs.on the cost of production of water plus Rs. 30.92 per 1000 ltrs. on sewage disposal services which is based on revenue expenditure of last year (2023-24). The rates of water supply through meter, for domestic as well as non-domestic (commercial) purposes, are charged on the basis of the paying capacity of consumers or their nature of business as per the rate schedule approved by the Standing Committee from time to time.

[A] Out of the total water supply of the Corporation, the consumption of water, in respect of a class domestic consumers viz. common as well as individual stand post connections in slums, chawls, high hill hutments and others is approximately 206266 ML. during the last year (2023-24) and is charged at the rate of Rs.4.76 to Rs. 9.54 per 1000 ltrs. plus 70 percent sewerage charges thereupon. A total revenue of Rs.200.27 crores yearly is generated on account of the supply of water to this category of consumers by the Corporation. However for the supply of water and sewage disposal, the Corporation incurred total expenditure of Rs.904.01 crores, thus this category of consumers is benefited with a subsidy to the extent of Rs.703.74 crores during the last year (2023-24).

[B] The category of consumer viz. residents of Co-Op. Housing Societies, Apartments, Charitable Trust, Educational Institutions, Public Gardens, Prison and Jails etc. has been supplied with total quantity of approximately 500482 ML. water during the last year(2023-24) which is charged at the rate of Rs.6.36 and Rs.12.74 per 1000 ltrs. as water charges plus 70 percent sewerage charges thereupon. A total revenue of Rs.788.72 crores is generated by the Corporation during the last year (2023-24) on account of water supply & sewage disposal from this category of consumers. However, as mentioned above the Corporation incurs the total expenditure of Rs.2193.49 crores during the last year (2023-24), due to which this category of consumers is benefited with a total subsidy of Rs.1404.77 crores during the last year (2023-24). Thus a total subsidy of Rs.2108.51 crores is granted to all the aforesaid categories of domestic consumers during the last year (2023-24).

[C] In addition to the categories of consumers mentioned above, the Corporation supplies water to commercial, industrial and other professional category of consumers too. Depending upon the nature of business these categories are charged at the rates, ranging from Rs.25.46 to Rs.190.97 per 1000 ltrs. plus 70 percent sewerage charges there upon. Therefore, though the Corporation is granting subsidy to certain categories of consumers as mentioned above, the subsidy is met partially from the revenue generated from the commercial, industrial and other professional categories of consumers.

### 3.2 Scavenging, Transporting & Disposal of Waste:

It is an obligatory duty of the Corporation to provide services towards scavenging, transporting and disposal of waste as per Section 61(c) of the Mumbai Municipal Corporation Act 1888 and the same fall under Budget ‘A’ (Fund Code 11) . The Corporation has to provide these services to all the classes of citizens, though the revenue received from these services is meagre as compared to the expenditure incurred on these services. For providing these services, the Corporation does not recover any specific charges from the citizens of Mumbai, towards the sanitation/services and most of the expenditure on the same is met from the revenue accruing from the Property Taxes, especially the General Tax, and Grant in aid received from State Govt. on account of Compensation in lieu of Octroi.

Though, a large proportion of population (about 50%) in Mumbai, is staying in slums areas, the revenue earned by way of Property Taxes from these citizens is meagre as compared to the Property Taxes recovered from the other non slum property owners. The revenue received by way of Property Taxes from the slum dwellers is too meagre to meet the expenditure on the services provided to them. Therefore, the expenditure incurred is required to be met through cross subsidy, from the taxes recovered from other sources. For providing scavenging services to the total population of 1 crore, 24 lakh, 32 thousand (as per census year 2011), the Corporation had incurred an expenditure of Rs.2781.1014 crores during last year (2023-24) against which it has received only Rs.4.81 Lakh by way of Trade Refuse & other Charges. Thus, it means that the Corporation bridged the gap of about 100% i.e. Rs.2781.0533 crores between the income and expenditure on these services from the other sources like Property Tax and Grant in aid received from State Govt. on account of Compensation in lieu of Octroi.

### 3.3 Street lighting:

As providing Street light on the roads is also an obligatory duty of the Corporation as per Section 61(n) of the Mumbai Municipal Corporation Act 1888, it is provided to all, irrespective of any specific class or locality. For providing street lighting on major roads, footpaths, small and internal roads, passages in the hutment area, footways, bridges and subways, etc., the Corporation had incurred an expenditure of around Rs. 262.3214 crores during last year (2023-24). Since, there was no independent source of revenue for meeting the expenditure incurred on providing street lighting, the entire expenditure met from other sources like Property Tax and Grant in aid received from State Govt. on account of Compensation in lieu of Octroi.

4. This report is submitted to the Administartor (Standing Committee) for examining the same and for onwards submission to the Administartor (Corporation) alongwith its recommendations, if any, as per Section 126G(2) read with Section 6C(1) of the Amended Mumbai Municipal Corporation Act, 1888.

(Bhushan Gagrani)
**Municipal Commissioner**

**Municipal Commissioners Office,**
**Mumbai.**
**Date: 29.01.2025**

मुद्रक : व्यवस्थापक, महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई - ४०० ०११
J-72120